पत्र लिहिण्यास कारण की आत्ताच लोकसभेच्या निवडणूका झाल्या आणि महाराष्ट्रात काही ठिकाणी धक्कादायक निर्णय समोर आले. यामुळे पुन्हा एकदा 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' हा राजकीय पक्ष आणि त्याचे सर्वेसर्वा माननीय श्री. राज ठाकरे चर्चेत आले. महाराष्ट्रात 'मनसे'ने उभ्या केलेल्या १२ उमेदवारांचा फटका शिवसेना-भाजपा युतीला जोरदार बसला आणि त्या प्रत्येक ठिकाणी मराठी उमेदवारांच्या मताचे विभाजन होऊन 'तुला नाही, मला नाही.....' च्या धर्तीवर आघाडीला अविश्वसनीय असा विजय मिळाला. 'मनसे'मुळे मराठी मतांचे विभाजन झाले असा सरसकट आरोप राज ठाकरे यांच्यावर केला गेला. परंतु या अश्या तऱ्हेची वक्तव्य करून उद्धव ठाकरे स्वत:चे हसू करून घेत आहेत. त्यांनी केलेले मुख्य आरोप म्हणजे १) मनसे ने मराठी मते फोडली आणि २) आता दिल्लीत मराठी माणसांचा आवाज कोण उठवणार ?

'मनसे'ने जर मराठी माणसांची मते फोडली असे शिवसेनेला वाटत असेल तर हे असे का झाले याचे आत्मपरीक्षण त्यांनी करायला नको का ? ही मते फुटायला किंवा शिवसेनेकडेच न राहायला आपण कुठेतरी कमी पडलो हे मान्य करायची त्यांना लाज वाटते. यापूर्वी जेव्हा राज ठाकरे शिवसेनेतच होते, तेव्हा का नाही शिवसेनेचे उमेदवार निवडून आले ? यापूर्वी ५ वेळा लोकसभेवर निवडून जाऊन कॅबिनेट मंत्रीपद भूषवलेले ७८ वर्षाचे तरूण(?) श्री. राम नाईक गेल्यावेळी गोविंदासारख्या कसलाही राजकारणाचा अनुभव नसलेल्या माणसासमोर का हरले ? याचे कारण एकतर ५ वेळा जिंकल्यावर त्यांनी मतदारांना गृहीत धरायला सुरूवात केली. रेल्वेच्या चौपदरीकरणाव्यतिरिक्त कोणतेही भरीव काम जनतेकरता केले गेले नाही. शिवाय पेट्रोलियम मंत्री झाल्यावर स्वत:च्याच आप्तांना परवाना देण्याचे काम. यामुळे जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवून देऊनसुद्धा पुन्हा सत्ता उपभोगायची त्यांची खाज काही जिरत नाही.

निलेश राणे यांच्या विरोधात श्री. सुरेश प्रभू उभे होते, जे एके काळी भाजपाच्या सरकारात होते. तिथे मनसेचा कोणताही उमेदवार उभा नव्हता त्यामुळे तिथे मते न फुटता शिवसेनेला जागा मिळायला हरकत नव्हती. पण तसे घडले नाही. ती जागा मनसेच्या उमेदवाराअभावीसुद्धा शिवसेनेला का मिळू शकली नाही ? याचे उत्तर उद्धव ठाकरे देऊ शकतील का ?

'भाजपा'ने वाजपेयी यांना पंतप्रधान करवले ते राममंदिराच्या मुद्दयावर. बाबरी मशिद पाडल्याचे श्रेय त्यावेळी शिवसेनेने घेतले होते. ही बाबरी मशिद पाडली त्यावेळी असंख्य कारसेवक आणि त्यानंतर झालेल्या मुंबई दंगलीत निरपराध जनता वेठीला धरली गेली. पण या घटनेला आज १५ वर्षांपेक्षा जास्त काळ होऊन गेल्यावर सुद्धा शिवसेना-भाजपा युती त्या जागी राममंदिराची एक वीट सुद्धा ठेऊ का शकले नाहीत ? तिथे मंदिर बांधावे की नाही हा मुद्दा वेगळा पण 'मंदिर वही बनायेंगे....' च्या जोशात निवडणूक लढवली गेली होतीच. यानंतर शिवसेना-भाजपा कडून ५ वर्षाच्या सत्तेत मुंबईतल्या फ्लाय ओव्हर्स व्यतिरिक्त कोणतेही भरीव काम झाले नाही. सहाजिकच त्यानंतरच्या कोणत्याही निवडणूकीत भाजपा-शिवसेना युती सत्ता मिळवू शकली नाही.

बरं जिथे सत्ता आहे तिथे तरी काही विधायक कामे केली जातील तर तेही नाही. मुंबई महापालिकेत सत्ता असून, मुंबईच्या महापौर गेले तीन वर्ष सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना गणेशमूर्तींची उंची कमी करायला सांगत आहेत, त्यांना या विधायक कामाबद्दल पक्षाध्यक्ष म्हणून पाठिंबा देणे दूरच उलट त्यांच्यावरच हिंदुत्वविरोधी असल्याचा आरोप केला गेला. मूर्तीची उंची हा वाद आजच्या घडीलाही चालूच आहे. आपल्याच आराध्य दैवताची विटंबना पाहायची आणि तरीही धर्मनिष्ठ म्हणत राहायचे हा कसला भंपक हिंदुत्ववाद ? तरीही महापौरांनी आपल्या परीने हा प्रश्न सोडवण्याकरिता स्वत:च्या बंगल्यात कृत्रिम तलाव तयार केले आणि त्यांची भूमिका पटलेल्या असंख्य हिंदुत्ववाद्यांनी धर्माचा बाऊ न करता तिथे विसर्जन केले.

'मनसे'ने युतीची मते खाऊन सुद्धा निवडून मात्र कोणी येऊ शकले नाही त्याचा आसूरी आनंद म्हणून दुसरा खवचट आरोप जेव्हा उद्धव ठाकरे यांनी केला की, आता दिल्लीत मराठी माणसाचा आवाज कोण उठवणार ? तेव्हा त्यांना असे सांगावेसे वाटते की, जेव्हा 'मनसे'ने मराठीचा मुद्दा काढून आंदोलने सुरू केली आणि त्यात त्यांना यश मिळाल्यावर शिवसेनेने अस्वस्थ होऊन हा आमचाच मुद्दा आहे अशी केविलवाणी ओरड सुरू केली. त्यावेळी फक्त मनोहर जोशी यांनी संसदेत थोडाफार पाठींबा दिला. बाकीचे सगळे मराठी दिग्गज नेते मनसेची भूमिका मनोमन पटून सुद्धा केवळ सत्तेच्या हव्यासापायी काहीही पाठींबा देऊ शकले नाहीत आणि मनसेची भूमिका योग्य असली तरी कृती चुकीची आहे अश्या 'नरो वा कुंजरो वा' धोरणाने राहिले.

मराठीचा मुद्दा शिवसेनेचा होता यात काही वाद नाही पण हिंदुत्ववादी भाजपाच्या मागे लागून त्यांनी मराठी आणि हिंदुत्व अश्या दोन दगडांवर पाय ठेऊन वाट चालायला सुरूवात केली आणि आता ना धड इकडे ना धड तिकडे असे करत तोंडघाशी पडले आहेत. गेली अनेक वर्षे मराठी मुद्दा शिवसेनेचा असताना...., महापालिकेत सत्ता असताना... दुकानांच्या पाट्या मराठी का होत नाही ? कंत्राटदार अमराठी कसे चालतात ? मराठी चा मुद्दा धरून असलेल्या शिवसेनेने लोकप्रतिनिधी सत्तेत असतानाही मनसेला मराठीचाच मुद्दा धरून आंदोलने का करावी लागतात ? या मनसेने विचारलेल्या प्रश्नांना शिवसेनेकडे खरंच काहीही उत्तरे नाही. कारण राज ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे यांना काही करायची इच्छाच नाही.

म्हणूनच शिवसेनेला आज अनेक वर्षे पक्ष स्थापून सुद्धा सत्ताधारी पक्ष होता आले नाही. केवळ विरोधी पक्षातच बसावे लागले तेही युतीच्या साहय्याने. आज उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व सुद्धा बाळासाहेब आहेत तोपर्यंतच राहील. पण बाळासाहेबांच्या नंतर काय. राज ठाकरे यांनी वेळीच बाजूला होऊन त्यांचे बाहूबल दाखवून दिले. पण शिवसेनेचे हाल नंतर कोण खाणार ?

श्री. राज ठाकरे यांना असे सांगणे आहे. तुमच्याचसारखे आम्हीसुद्धा तुमच्या विठ्ठलाला मानणारे आहोत. पण तुमच्यावर झालेल्या अन्यायाला तुमच्या पाठीशी उभे राहून साथ देऊ. तुम्ही लढा आम्ही तुमच्या पाठीशी आहोतच. पण तुमच्याही आजूबाजूला बडवेगिरी होत असेल तर तिला वेळीच आवर घाला. तुम्हीही याच मार्गाने गेलात तर तुमचा आजचा मतदार तुमच्या तोंडात शेण घातल्याशिवाय राहाणार नाही. ज्याप्रमाणे पूर्वी माननीय बाळासाहेबांनी जसे जनतेबरोबर राहून, तळागाळातल्या लोकांच्या संपर्कात राहून त्यांना जसे आपलेसे केले; तसेच तुम्हीही करावे अशी तुमच्याकडून सामान्य नागरीकाची अपेक्षा आहे.

तेव्हा नुसतीच एकमेकांवर चिखलफेक करण्यापेक्षा किंवा भय्यांना मारण्यापेक्षा इतर पद्धतीचा अवलंब करून भूमिपुत्रांना त्यांचा हक्क कसा मिळेल यावर जास्त लक्ष केंद्रित करा. आज जवळपास १५ लाख तरूण जनता तुमच्या पाठीशी उभी आहे कारण तुम्ही दिलेला विश्वास त्यांना जास्त मोलाचा वाटतो. पण जर का त्या विश्वासाला तडा गेला तर पुढच्या निवडणूकीत हेच १५ लाख मतदार तुम्हाला होत्याचे नव्हते करतील. तेव्हा भाऊबंदकी बाजूला ठेऊन जनतेला पटतील अशी कामं करा. अनेक क्षेत्र आहेत त्याकरता, आणि जनतेच्या समस्यांना तर तोटाच नाही. आगामी विधानसभा निवडणूकीकरता शुभेच्छा.

एक मनसे सैनिक